बोगस वैद्यकीय व्यवसायीकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याकरिता जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुर्नविलोकन समितीची स्थापना.........

# महाराष्ट्र शासन

**वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग**

शासन निर्णय क्रमांक :सीआयएम १०९९/प्र.क्र.३५५/९९/अधिनियम,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक ७ फेब्रुवारी, २०००

पहा : शासन निर्णय, वै.शि.वऔ.द्र.वि. क्रमांक- सीआयएम १०९१/सीआर १७२/९१/एमईडी-८, दिनांक ५.९.९१.

**शासन निर्णय** : बोगस वैद्यकीय व्यावसायिक शोधून काढण्यासाठी शासन निर्णय क्रमांक सीआयएम १०९१/सीआर १७२/९१/एमईडी-८, दिनांक ५.९.९१ अन्वये जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय तसेच नगरपालीका व महानगरपालीकास्तरीय समित्या स्थापन करण्याचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्यानुसार स्थापन झालेल्या समित्यांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद व नियमित फीडबॅक मिळेल अशी अपेक्षा होती. तथापि तसे झाले नाही. परिणामी बोगस वैद्यकीय व्यावसायिकांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली व त्यामुळे या विभागास प्रामुख्याने मान्यता नसलेल्या इलेक्ट्रोपॅथी/इलेक्ट्रोहोमिओपॅथी व्यावसायीकांच्या निरनिराळया न्यायालयीन प्रकरणांना तोंड द्यावे लागत आहे.

२. बोगस वैद्यकीय व्यावसायिकांवर आळा घालण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई करण्याची नितांत गरज आहे. यासाठी खालीलप्रमाणे प्रत्येक जिल्हयात जिल्हा दंडाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय पुर्नविलोकन समिती गठीत करण्यास शासन मंजूरी देत आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जिल्हा दंडाधिकारी | .......... | अध्यक्ष |
| २ | जिल्हा पोलीस अधिक्षक | .......... | सदस्य |
| ३ | अधिष्ठाता वैद्यकीय महाविद्यालय(असल्यास) | .......... | सदस्य |
| ४ | जिल्हा शल्यचिकित्सक | .......... | सदस्य |
| ५ | जिल्हा आरोग्य अधिकारी | .......... | सदस्य |
| ६ | जिल्हा माहिती अधिकारी | .......... | सदस्य |
| ७ | सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन | .......... | सदस्य |
| ८ | उप जिल्हा पोलीस अधिक्षक(मुख्यालय) | .......... | सदस्य सचिव |

यात्यतिरिक्त प्रस्तूत समितीचे अध्यक्ष यांनी खालील संस्थाचा प्रत्येकी एक प्रतिनिधी या सम्तिीवर नामनिर्देशित(co-opt) करावा :-

(१) कंझ्युमर्स फोरम
(२) नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीक
(३) हयुमन राईटस् ॲक्टिव्हिस्टस्

३. सदर पुर्नविलोकन समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील :-

१. मॅजिक रेमिडीज् कायद्याअंतर्गत आक्षेपार्ह जाहिरातींचा आढावा घेऊन त्याबाबत आवश्यक ती कारवाई करणे.

२. जिल्हयातील कार्यरत असलेल्या बोगस वैद्यकीय व्यवसायीकांचा आढावा घेऊन त्यांचेविरुध्द संबंधित न्यायालयात खटले दाखल करण्याची रितसर कारवाई पोलीसांमार्फत करणे. (यासाठी समितीचे सदस्य जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी संबंधित पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविणे)

३. बोगस वैद्यकीय व्यवसायिकांबाबत न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा नियममितपणे आढावा घेणे.

४. मान्यताप्राप्त वैद्यकीय व्यवसायांबाबत जनतेमध्ये जनजागृती करणे.

४. या जिल्हास्तरीय पुनर्विलोकन समितीने दर तीन महिन्याने बैठक घेऊन नेमून दिलेल्या कार्यकक्षेप्रमाणे कार्यवाही करुन आपला तिमाही अहवाल वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास नियमितपणे पाठवावा.

५. हा शासन निर्णय महसूल व वन विभाग, गृह विभाग, ग्राम विकास विभाग व सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या संमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(जी.एम.फोपळणकर)
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव.

प्रति,

सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सचिव, ग्राम विकास विभाग ,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सचिव, विधी व न्याय विभाग,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
सर्व जिल्हा दंडाधिकारी ,
सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक,
सर्व उप जिल्हा पोलीस अधिक्षक(मुख्यालय),
सर्व अधिष्टाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
सर्व जिल्हा शल्यचिकित्सक,
सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी,
सर्व जिल्हा माहिती अधिकारी,
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई,
संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
सर्व सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन,
सर्व महानगर पालीका,
सर्व नगर परिषदा,
सर्व जिल्हा परिषदा,
प्रबंधक, महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल, मुंबई,
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन,
प्रबंधक, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिआपॅथी, मुंबई,
सर्व गट विकास अधिकारी (पंचायत समिती),
वै.शि. व औ.द्र. विभागातील सर्व उप सचिव,अवर सचिव, कक्ष अधिकारी,
निवडनस्ती,अधिनियम कक्ष.